नोव्हेंबरमध्ये हे विधेयक मंजूर झालं होतं, असं ते म्हणाले. तंत्रज्ञान क्षेत्रातल्या कंपन्यांना नागरिकांसाठी संविधानाच्या आठव्या सूचीमध्ये नमूद केलेल्या सर्व भाषांमध्ये सूचना देणं बंधनकारक करण्याची तरतूद यात आहे.

<><><><><>

विद्यार्थ्यांनी परीक्षांच्या काळात ताण न घेता ध्यासवृत्ती जोपासावी असा सल्ला केंद्रीय माहिती आणि तंत्रज्ञानमंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिला आहे. नवी दिल्लीत आयोजित एक्झॅम वॉरिअर्स कला महोत्सवात आज त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला आणि त्यांना मार्गदर्शन केलं. अभिनेता आणि खेळाडू स्वतःच्या कामाचा ध्यास घेत असल्यानं ते उत्कृष्ट कामगिरीचं दर्शन घडवतात, असं ते म्हणाले. या महोत्सवात विविध शाळांमधल्या ५ हजार विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता.

<><><><><>

'उत्तर मुंबई'ला 'उत्तम मुंबई' करण्याचा संकल्प पूर्ण करण्याच्या दृष्टीनं वेगानं काम सुरू असल्याची ग्वाही गोयल यांनी आज दिली. उत्तर मुंबईतल्या नागरी सेवांबाबत मुंबई महानगरपालिकेत झालेल्या बैठकीनंतर ते वार्ताहरांशी बोलत होते. उत्तर मुंबई आणि संबंधित भागातल्या एकंदर ६० हजार कोटी रुपये मूल्यांच्या नागरी सुविधांवर बैठकीत चर्चा झाल्याचं आणि विविध कामं पूर्ण करण्यासाठी कालमर्यादा ठरवल्याचं गोयल यांनी सांगितलं.

<><><><><>

आगामी दिल्ली निवडणुकांसाठी नवी दिल्लीत भाजपनं आज आपचे संयोजक अरविंद केजरीवाल यांच्या विरोधात माजी खासदार परवेश वर्मा यांची तर कलकाजी इथल्या जागेसाठी दिल्लीच्या मुख्यमंत्री अतिशी यांच्या विरोधात रमेश

तामिळनाडूच्या विरुधूनगर जिल्ह्यात सत्तूर भागात आज एका फटाक्याच्या कारखान्यात झालेल्या स्फोटात ६ जणांचा मृत्यू झाला तर २ जण गंभीर जखमी झाले.

<><><><>

देशाच्या उत्तर भागात दाट धुक्यामुळे दृश्यमानता कमी झाल्यानं त्याचा परिणाम रेल्वे वाहतुकीवर झाला आहे. या मार्गावरून दिल्लीकडे जाणाऱ्या सुमारे ४० गाड्या त्यांच्या निर्धारित वेळेनुसार पाच तास उशीरा धावत असल्याची माहिती भारतीय रेल्वेनं दिली.

<><><><>

अजमेर इथल्या सुफी संत ख्वाजा मोईनुद्दीन हसन चिश्ती दर्ग्यावर आज प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी पाठवलेली चद्दर अर्पण करण्यात आली. अजरमेर इथं ८१३ वा उर्स सुरू झाला आहे. हे औचित्य साधत केंद्रीय अल्पसंख्यक मंत्री किरण रिजीजू यांनी प्रधानमंत्र्यांच्या वतीनं दर्ग्यात चद्दर अर्पण केली.

किरण रिजीजू यांच्या हस्ते दर्ग्याच्या संकेतस्थळाचं आणि गरीब नवाज या ॲपचं उद्घाटन झालं. दर्ग्याच्या संकेतस्थळावरून तिथं होणाऱ्या कार्यक्रमांचं थेट प्रसारण केलं जाणार आहे. तर गरीब नवाज मोबाईल ॲपच्या माध्यमातून भाविकांना राहण्यासाठी नोंदणी करता येईल. तसंच दर्ग्यात दान करण्याच्या सुविधा उपलब्ध करून दिली आहे.

<><><><>

इक्वेडोरमध्ये राष्ट्राध्यक्ष डॅनियल नोबोआ यांनी, तिथे अंतर्गत अशांतता आणि सशस्त्र संघर्ष सुरु असलेल्या सात प्रांत आणि तीन नगरपालिका क्षेत्रात ६० दिवसांची आणीबाणी जाहीर केली आहे. गुन्हेगारीचं वाढतं प्रमाण आणि संघटित सशस्त्र गटांची वाढतं प्रमाण ही आणीबाणीची लागू करण्यामागची मुख्य कारणं

